क्रमांक : ३००१ /ब कक्ष,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०२२

:: परिपत्रक ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२२ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे सुधारित विवरणपत्र ..**

**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १५३२/ब, दिनांक २८ जानेवारी, २०२२**

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीपासून सुरु होणारे आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२ आता गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार शनिवार, दिनांक ०५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाची बैठक होणार असल्याने उक्त दिवशी तारांकित प्रश्नोत्तरांच्या तासात गट क्र.३ ची बुधवार, दिनांक ०२ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहात चर्चेला घेण्यात येईल. गट क्र.३ मध्ये १) उप मुख्यमंत्री, २) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री, ३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, ४) ग्रामविकास व कामगार मंत्री, ५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री, ६) महिला व बालविकास मंत्री, ७) मृद व जलसंधारण मंत्री यांचा समावेश असणार आहे.

(विलास आठवले)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

D:\Reema\Final BSC Discussion-15.02.2022\Paripatak.doc